महावितरण
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. ६९८५२२००
Email : ciro@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी - ९, प्रकाशगड, ४ था मजला,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई -५१.

जा. क्र. : औसंवि/ब/५२७२ दिनांक : १५.०२.२०२४

प्रति,
मुख्य अभियंता
म.रा.वि.वितरण कं.मर्या.,
परिमंडळ कार्यालय अकोला / अमरावती / औरंगाबाद / बारामती / भांडूप / चंद्रपूर / गोदिंया / जळगांव / कोल्हापूर / कल्याण / लातूर / नांदेड / नागपूर / नाशिक / पुणे / रत्नागिरी.

**विषय :-** मेडिक्लेम योजना सन २०२४-२५ करीता **Employee Portal** अंतर्गत अवलंबिताची नावे अद्ययावत करणेबाबत.

******

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०२३-२४ ही दि. १४.०५.२०२४ रोजी संपुष्टात येत आहे. त्यानुसार सदर योजना सन २०२४-२५ करीता सलगपणे सुरु ठेवण्यासाठी कुटूंबाच्या व्याख्येनुसार कर्मचाऱ्यावर अवलंबून असलेल्या ०५ सदस्यांची नावे Employee Portal मार्फत अद्ययावत करण्याकरीता खालील प्रमाणे सुचना पारित करण्यात येत आहेत.

**MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०२४-२५**

१. सदर योजनेचा कालावधी दि. १५.०५.२०२४ ते दि. १४.०५.२०२५ असा राहील.
२. त्याकरिता माहे २१ फेब्रुवारी २०२४ पासून माहे २० एप्रिल २०२४ पर्यंत Employee Portal मार्फत अवलंबितांची नावे अद्यावत करण्याकरीता लिंक Open करण्यात येणार आहे.
३. खालील नमूद केलेल्या कुटूंबाच्या व्याख्येनुसार Employee Portal अंतर्गत Mediclaim Application या शिर्षकाखाली Family Members Details for mediclaim यावर Click करुन, अवलंबितांची नावे अद्ययावत करावयाची आहेत.

i. **कुटूंबाची व्याख्या**

- कर्मचारी / अधिकारी यांची पत्नी किंवा पती.
- कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/ सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.
  (तथापि, विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुलांच्या बाबतीत खालील अटी लागू राहतील.

  - १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.
  - तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
  - मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.
  - कर्मचाऱ्यांवर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.

- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी / अधिकारी यांचे आई-वडील, **महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून आणि त्यांच्याबरोबर राहत असलेल्या त्यांच्या आई-वडीलांची किंवा सासु-सासऱ्यांपैकी एका जोडीचीच निवड करता येईल.**
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.
- कर्मचारी / अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.
- या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी / अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी / अधिकारी यांच्यावर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु.५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोटीत / विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

ii. यापूर्वी आपण Employee Portal मार्फत अद्ययावत केलेली आपल्या अवलंबिताची नावे आपणास स्क्रिनवर दिसणार आहेत.

iii. त्यामध्ये आपणांस कोणताही बदल करावयाचा नसल्यास किंवा त्यामध्ये काही बदल करावयाचा असल्यास आपण विहीत मुदतीत (अंतिम दि.३०.४.२०२४ पर्यंत) अवलंबितांची नावे Save व Submit करणे बंधनकारक राहील.

iv. तद्नंतर कर्मचाऱ्यांच्या अवलंबितांची नावे अद्ययावत करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

v. दि.३०.०४.२०२४ पर्यंत सेवानिवृत्ती होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन २०२४-२५ ची मेडिक्लेम योजना लागू राहणार नाही.

(संजय रा. ढोके)
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी**

**प्रत सविनय सादर :**

१. मा.संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) / (वाणिज्य) / (मासं), महावितरण, सां.का., मुंबई.
२. सर्व कार्यकारी संचालक व विभाग प्रमुख.

**प्रत :**

उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण, अकोला / औरंगाबाद / अमरावती / भांडूप / बारामती / चंद्रपूर / गोंदिया / कल्याण / कोल्हापूर / लातूर / जळगांव /नाशिक / पुणे / नागपूर / रत्नागिरी / नांदेड.

old pc data bacup\D\old d drive\madhuri\A.T.Kadam new\PARIPELLI/ Letter .docx